नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील "वैद्यकीय आरोग्य अधिकारी" या पदावर डॉ.बाळासाहेब सोनावणे, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा संचालनालय (महाराष्ट्र राज्य), मुंबई <u>यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याबाबत</u>.

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन आदेश क्रमांक:- नमुंम-१२१९/प्र.क्र.३१/नवि-२८

४ था मजला, मंत्रालय (मुख्य इमारत),

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मुंबई- ४०० ०३२.

दिनांक:- २९ जुलै, २०१९

<u>वाचा</u>:- १) आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र.नमुंमपा/प्रशासन/आस्था-१६/ प्र.क्र.७९/७५२/२०१९, दि.०८.०३.२०१९.

२) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/कक्ष-१/प्रशास-अधि./टे-५/डॉ सोनावणे/ नक्रि३/नमुंमनपा/प्रतिनियुक्ती/३३८२/२०१८, दि.०९.१०.२०१८.

३) नवी मुंबई महापालिका आरोग्य विभाग सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१७.

<u>प्रस्तावना</u>:-

आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी दि.२६.०२.२०१८ च्या पत्रान्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मंजूर व रिक्त "वैद्यकीय आरोग्य अधिकारी" या पदावर आरोग्य सेवा संचालनालयाकडील अधिकारी प्रतिनियुक्तीने उपलब्ध करून देण्याची सार्वजनिक आरोग्य विभागास विनंती केली होती. सदर विनंतीस अनुसरून संचालक, आरोग्य सेवा संचालनालय (महाराष्ट्र राज्य), मुंबई यांनी संदर्भीय दि.०९.१०.२०१८ च्या पत्रान्वये नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य सेवेची स्वरुप व्याप्ती व निकड लक्षात घेऊन तसेच महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या मंजूर सेवा प्रवेश नियमानुसार "वैद्यकीय आरोग्य अधिकारी" या पदासाठी डॉ.बाळासाहेब संभाजीराव सोनावणे, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा संचालनालय (महाराष्ट्र राज्य), मुंबई यांच्या सेवा उपलब्ध करून देण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागास शिफारस केली आहे.

२. सार्वजनिक आरोग्य विभागाने शिफारस केलेले डॉ.बाळासाहेब संभाजीराव सोनावणे, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा संचालनालय (महाराष्ट्र राज्य), मुंबई यांची नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मंजूर व रिक्त "वैद्यकीय आरोग्य अधिकारी" या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती झाल्यास त्यांना कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करण्यास सहमती दिलेली आहे. त्यास अनुसरून डॉ.सोनावणे यांची नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील "वैद्यकीय आरोग्य अधिकारी" या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याबाबत पुढीलप्रमाणे शासन आदेश विहित करण्यात येत आहे:-

<u>शासन आदेश</u>:-

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील "वैद्यकीय आरोग्य अधिकारी" या पदावर डॉ.बाळासाहेब संभाजीराव सोनावणे, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा संचालनालय (महाराष्ट्र राज्य), मुंबई यांची प्रथमत: १ वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

२. डॉ.सोनावणे यांची सदर प्रतिनियुक्ती ही महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ च्या परिशिष्ट-२ मध्ये विहित करण्यात आल्यानुसार प्रतिनियुक्तीच्या पदाचा कार्यभार स्विकारल्यापासून एक वर्ष कालावधीसाठी खालील अटींच्या अधीन राहून करण्यात येत आहे:-

(अ) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनास आवश्यक वाटली, तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन/सक्षम प्राधिकारी राखून ठेवील.

(ब) जर त्यांची सेवा स्वीयेतर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही, तर त्यांना मूळ विभागाकडे पाठविण्याची मुभा स्वीयेतर नियोक्त्याला राहील. मात्र, याप्रमाणे परत पाठविण्यापूर्वी स्वीयेतर नियोक्त्याने शासनाला/सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे;

(क) त्यांनी मूळ विभागाकडे परत जाण्याचा उद्देश आहे, अशी कमीत कमी ३ महिन्यांची लेखी नोटीस शासनाला दिल्यानंतर त्यांना मूळ विभागाकडे परत पाठविण्याबाबत शासन मान्यतेनंतर मुभा राहील.

(ड) डॉ.सोनावणे यांना प्रतिनियुक्तीच्या काळातील प्रदाने नियमानुसार लागू राहतील.

३. डॉ.सोनावणे यांना प्रतिनियुक्तीच्या पदी रुजू होण्याकरिता सार्वजनिक आरोग्य विभागाने तातडीने कार्यमुक्त करावे.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक २०१९०७२९१४२६३३७६२५ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Navnath Ravaji Wath

Digitally signed by Navnath Ravaji Wath
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=885bfbac1d8ef74e3ffe622f226b31d75c2a13f319632f0da72fd54e57ac00ff, serialNumber=30e05bf6f1ed11d82b5689c9fc6b47a271a6b22790a9388dba7f3db15e247ff5, cn=Navnath Ravaji Wath
Date: 2019.08.21 12:11:10 +05'30'

(नवनाथ रा. वाठ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

डॉ.बाळासाहेब संभाजीराव सोनावणे, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा संचालनालय (महाराष्ट्र राज्य), मुंबई.

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

३) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय (महाराष्ट्र राज्य), मुंबई.
४) महापौर, नवी मुंबई महानगरपालिका, जि.ठाणे.
५) आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, जि.ठाणे.
६) मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
७) प्रधान सचिव (नवि-२) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
८) उप सचिव (नवि-२८) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९) निवडनस्ती (नवि-२८.